# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील
# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिध्दी निवेदन
# दि.१६.०८.२०१७.(पहिली विशेष फेरी-गुणवत्ता यादी).

इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७–१८ साठी पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादी दिनांक १६.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता जाहीर होणार आहे. प्रवेश घेणेबाबतचे वेळापत्रक यापुर्वी ठरल्याप्रमाणे आहे.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये द्वारा कला, विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी (HSVC)या शाखेत प्रवेश दिले जाणार आहेत.

**पहिली विशेष फेरी गुणवत्ता यादीनुसार सांख्यिकी माहिती**

| अ.क्र. | तपशिल | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीसाठी पात्र/शिल्लक अर्ज संख्या | ७७२१ |
| २ | पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीत दिलेले प्रवेश | ६६६२ |
| ३ | पहिला पसंतीक्रम मिळालेले विद्यार्थी | ४६४५ |
| ३ | पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीत दिलेल्या पसंतीक्रमानुसार प्रवेश न मिळालेली विद्यार्थी संख्या | १०५९ |

कला, विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी (MCVC) शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम) साठी जेवढया प्रवेश इच्छुकांनी अर्ज केला होता. त्यांना पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीत शाखा व माध्यमनिहाय आलेल्या प्रवेश अर्जानुसार व विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंती क्रमांक व गुणवत्तेनुसार पसंतीक्रमनिहाय सांख्यिकी माहिती (१ ते १० पसंतीक्रम) :-

| शाखा | माध्यम | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला/ विज्ञान/ वाणिज्य/ एमसीव्हीसी (MCVC) | /मराठी /इंग्रजी | ४६४५ | ७२६ | ३५३ | २८४ | १७४ | १४१ | १३२ | ७५ | ६९ | ६३ | ६६६२ |
| | एकूण | ४६४५ | ७२६ | ३५३ | २८४ | १७४ | १४१ | १३२ | ७५ | ६९ | ६३ | ६६६२ |

**पहिली विशेष फेरीतील गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपाशिल |
|---|---|---|---|
| १ | १६.०८.२०१७ | सायंकाळी ५.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची पहिली विशेष फेरीतील गुणवत्ता यादी जाहिर करणे |
| २ | १८.०८.२०१७<br>१९.०८.२००७ | स.१०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत | १. केंद्रीय प्रवेशाच्या पहिली विशेष फेरी गुणवत्ता यादीतील प्रवेश घेणे.<br>२. कोटा प्रवेश रिक्त जागांवर प्रवेश घेणे. |

**विद्यार्थी पालकांसाठी सूचनाः-**

१) पहिल्या विशेष फेरीमध्ये कॉलेज ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीचे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले असल्यास **दि १८.०८.२०१७ ते १९.०८.२०१७ या कालावधीत सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत** कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित करावा.

२) प्रवेशाच्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयांसाठी सूचना :-**

१) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन ॲलॉट झालेल्या यादीप्रमाणे विद्यार्थी/पालक कॉलेजमध्ये आल्यानंतरच त्यांचे प्रवेश नियोजित वेळेत ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

२). विद्यार्थी किंवा पालक कॉलेज मध्ये प्रवेशासाठी न आल्यास, आवश्यक ती कागदपत्रे सादर न करताच कोणत्याही विद्यार्थ्याला परस्पर ऑनलाईन ॲडमिट करु नये.

३) ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या विशेष फेरी मध्ये सहभागी होता आलेले नाही, अथवा ज्यांना प्रवेश मिळालेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रवेश प्रक्रियेबाबतच्या सूचना दि. १९.०८.२०१७ नंतर इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या संकेतस्थळावर व पुणे-पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जातील.

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

MRaut 16.8.17

(मिनाक्षी राऊत)
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१